# प्रेस नोट

दिनांक : २२/११/२०१९

| | |
|---|---|
| आरोपी लोकसेवक | विशाल अशोक बागुल, वय ३२, कनिष्ठ अभियंता, एम.एस.ई.डी.सी.एल. (म.रा.वि.वि.कंपनी) वरसोली शाखा, ता.अलिबाग जि.रायगड, (वर्ग-२) |
| आरोपी लोकसेवक यांचे कार्यालय | महराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसिटी डीस्ट्रबुशन कंपनी लि. अलिबाग उपविभाग-१, शाखा वरसोली. |
| मागितलेली रक्कम | १,२०,०००/- तडजोडी अंती १,१०,०००/- रूपये. (एक लाख दहा हजार रूपये) |
| स्विकारलेली रक्कम | ५०,०००/- रूपये. (पन्नास हजार रूपये पहिला हप्ता ) |
| पडताळणी दिनांक | दिनांक : २२/११/२०१९ रोजी. |
| सापळा कारवाई | दिनांक : २२/११/२०१९ रोजी १६.४२ वाजता |
| दाखल गुन्हा | पंचनाम्याची पुढील कार्यवाही चालु आहे. |
| सापळा पथक | श्री.मुकंद हातोटे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र यांचे मार्गदर्शनाखाली<br>अॅन्टी करप्शन ब्युरो, रायगड अलिबाग युनिटकडील<br>श्री. अधिकराव पोळ, पोलीस उप अधीक्षक,<br>श्री. किशोर साळे, पोलीस निरीक्षक<br>पोह/१७२२ दिपक मोरे, पोह/१०५३ विशाल शिर्के, पोना/७३९ सुरज पाटील,<br>पोना/१३१९ जितेंद्र पाटील, मपोना/१८१ स्वप्नाली पाटील, सफौ/अरूण घरत |
| थोडक्यात हकिकत | यातील तक्रारदार यांचे मौजे वरसोली ता.अलिबाग येथे घरगुती कॉटेज आहे. त्यांचे आलेले सर्व घरगुती लाईट बिल त्यांनी भरलेले आहे. परंतू त्यांनी सदरची वीज कमर्शियल कारणाकरीता वापरली म्हणून तकारदार यांना वीज चोरीची नोटीस देवून २,४७,०००/- रूपये दंड रक्कम भरणे करीता लोकसेवक विशाल बागुल यांनी वीज बिलावर हाती लिहून दिले. त्यावर तकारदार यांनी त्यांचे म्हणणे लोकसेवक बागुल यांना लिहून दिले होते की, त्यांनी सर्व वीज बिल भरलेले आहे. तसेच त्यांच्याकडे कमर्शियल वीज मिटरची मागणी केली असता तकारदार यांना कमर्शियल वीज मिटर दिलेले नाही. कमर्शियल बिल कमी करणेसाठी व तकारदार यांचेवर कारवाई न करणेसाठी लोकसेवक श्री.विशाल अशोक बागुल यांनी तकारदार यांच्याकडे १,२०,०००/- रूपयांची मागणी केली.<br><br>त्यानंतर तकारदार यांनी दिनांक २१/११/२०१९ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, रायगड- अलिबाग युनिटकडे वरीलप्रमाणे हकिगतीची तकार नोंदविली. सदर तकारीचे अनुषंगाने सर्व कायदेशीर बाबींचा अवलंब करून दिनांक २१/११/२०१९ रोजी व दिनांक २२/११/२०१९ रोजी पंच साक्षीदार यांचे समक्ष तकारीची पडताळणी केली असता कनिष्ठ अभियंता, विशाल अशोक बागुल यांनी कमर्शियल बिल कमी करणेसाठी व तकारदार यांच्यावर कारवाई न करणेसाठी तकारदार यांचेकडे तडजोडी अंती १,१०,०००/- (एक लाख रूपये हजार रूपये) लाचेची मागणी केली. त्याप्रमाणे आज दिनांक २२/११/२०१९ रोजी महाराष्ट्र राज्य विदयूत वितरण कंपनीच्या अलिबाग उपविभाग येथील कार्यालयात पंचांसमक्ष सापळा आजमावला असता कनिष्ठ अभियंता बागुल यांनी तकारदार यांचेकडून दिनांक ५०,०००/- (पन्नास हजार रूपये/-) (लाचेच्या रक्कमेचा पहिला हप्ता) स्विकारताना अॅन्टी करप्शन ब्युरो, रायगड पथकाने संध्याकाळी १६.४२ वा. चे सुमारास रंगेहाथ पकडले असून त्यांचेकडून लाचेची रक्कम रूपये पन्नास हजार रूपये/- हस्तगत करण्यांत आलेली आहे. सापळा पंचनाम्याची पुढील कार्यवाही सुरू आहे. |

**कोणत्याही शासकीय व निम-शासकीय कर्मचाऱ्याने सरकारी काम करण्यासाठी लाच मागितल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो, रायगड, अलिबाग कार्यालयाशी संपर्क साधा.....**

**<u>कार्यालय दुरध्वनी क्रमांक</u> :- ०२१४१-२२२३३१, <u>टोल फ्रि क्रमांक</u> : १०६४,**
**मोबाईल नंबर :- ९५९४६१३४४४ / ७३५०७५०८५०/९२८४३८९२८९**
**ई-मेल :- dyspacbraigad@gmail.com**

Scanned by CamScanner